सिंधुदुर्ग येथील रेण्वीय निदान प्रयोगशाळेकरिता उपकरणे व साधनसामुग्री खरेदीसाठीची रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः राआप्र २०१८/ प्रक्र-२८/आरोग्य ३(अ)
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग,
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ३१ मार्च, २०१८.

वाचा :-

१) **शासन निर्णय क्रमांकः शासन समक्रमांक २५ जानेवारी, २०१८**
२) **शासन निर्णय क्रमांकः उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य सेवा मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.उसंआसे/ रासाआप्रशा/ ११४७/ २०१८ दि.२६.२.२०१८ चे पत्र.**

प्रस्तावना :-

रेण्वीय निदान प्रयोगशाळा सिंधुदुर्ग येथे माकडताप, डेंग्यू, चिकनगुनिया, जापनीज एन्सेफालायटीस, मेंदूज्वर, विषमज्वर, पटकी, घटसर्प, शिगेला डीसेंटरी, व्हायल हिपेटायटीस ए व ई व लेप्टोस्पायरोसिस या आजाराच्या निदानासाठी आवश्क यंत्रसामुग्री, फर्निचर, रसायने, काचसामान उपकरणे खरेदी करण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ नुसार दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. उपसंचालक, यांचे दिनांक २६.०२.२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने सदरहू खरेदी विहीत मुदतीत होत नसल्याने याकरिता मंजूर केलेला निधी संक्षिप्त देयकावर काढण्यास मंजुरी देण्याची बाब विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

सिंधुदुर्ग रेण्वीय प्रयोगशाळेकरिता उपकरणे व साधनसामुग्री रु.१.१४ कोटी (अक्षरी रुपये एक कोटी चौदा लक्ष फक्त) इतका निधी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून संक्षिप्त देयकावर काढण्यास याव्दारे मंजुरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) शासन परिपत्रक क्रमांक मुंविनि १०१७/प्रक्र-३८/१७/विनियम दि.१८.१२.२०१७ मधील सूचनेनुसार (२२१० ०९८८) या लेखाशीर्षाखाली दि.३.०९.२०१७ यापूर्वीची तपशीलवार देयके प्रलंबित नाहीत.
२) दिनांक ३०.०९.२०१७ नंतर संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशिलवार देयकांचा तत्परतेने निपटारा करण्यात येईल.
३) या संक्षिप्त देयकाचे तपशीलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.
४) खर्च नियमित देयकाव्दारे करणे शक्य नसुन त्यासाठी संक्षिप्त देयकावर रकम काढणे अनिवार्य आहे.

५) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहीत मुदतीत सादर करण्याची व्यक्तिगत जबाबदारी उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांची राहील.

६) मासिक निधी विवरणपत्रानुसार या करिता निधी उपलब्ध आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. व्यय-१३/ १४८/२०१८ दि.२६.३.२०१८ व अनौपचारीक संदर्भ क्र. विनियम/ १९६/२०१८ दि. २७ .३. २०१८ प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११२३२३१९२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.31 16:36:05 +05'30'

(रा.शा.कौरते.)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल,महाराष्ट्र-१/२(लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),मुंबई.
२. आयुक्त,आरोग्य सेवा तथा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक (अर्थ व प्रशासन) आरोग्य सेवा, पुणे
५. उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे
६. उपसंचालक,आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा,पुणे
७. जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे/ सिंधुदुर्ग
८. वित्त विभाग (अर्थसंकल्प-९/ व्यय -१३/विनियम), मंत्रालय, मुंबई.
९. सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती आरोग्य ३अ